दै. लोकमत दि. 19/10/25

# गुन्हेच 'फ्लश आऊट'

## गुन्हे उदंड पण ठाण्यात नोंदच होईना

**तपास करु, मुद्देमाल परत देऊ असा पोलिसांचा नवाच फंडा सुरु...**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पदभार स्वीकारताच जिल्ह्यात गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी ऑपरेशन फ्लश आऊट सुरू केले आहे. परंतु याचा नेमका उलटा अर्थ ठाणे प्रमुखांनी काढला आहे. त्यामुळे गुन्हेगारांचे नव्हे तर गुन्हे नोंदीच फ्लश आऊट करण्याचा सपाटा सध्या सुरू आहे. त्यामुळे प्रत्यक्ष घडणारे गुन्हे आणि दाखल गुन्हे यामध्ये जमीन-अस्मानचा फरक आहे. विशेष म्हणजे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात अनेक घटना कैद झाल्यानंतरही पोलिसांकडे तपासाची तसदी घेतली जात नाही. त्यात स्थानिक गुन्हे शाखा तर सध्या नेमकी काय करते, असा सवालही उपस्थित होत आहे.

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यात गुन्हेगारांवर चांगलाच वचक निर्माण केला आहे. परंतु त्यांनी सुरू केलेल्या फ्लश आऊट मोहिमेलाच गळती लावण्याचे काम सध्या सुरू आहे. मटका, जुगार बंद असल्याचे वरकरणी दिसत असले तरी प्रत्यक्षात हे धंदे सुरूच आहेत. दररोज किरकोळ मटका अड्ड्यावर धाडी मारण्यात येत आहेत. तर दुसरीकडे गुन्हे दररोज घडत असले तरी ठाण्यात गेल्यानंतर दाखल करण्यास मात्र टाळाटाळ केली जात आहे. असाच काहीसा अनुभव अनेक प्रकरणांमध्ये येत आहे. १७ ऑगस्ट २०२४ मध्ये वजिराबाद भागात क्लासिक मेन्स वेअरच्या बाजूला यादव यांचे दुकान चोरट्यांनी फोडले. दुकान मालकाने वजिराबाद पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज देऊन तक्रारही केली. परंतु अद्याप गुन्हा दाखल नाही. विशेष म्हणजे त्यानंतर चोरट्याने पुन्हा तिथे येत सीसीटीव्ही कॅमेरे फोडण्याचा प्रयत्न केला. डीमार्ट रस्त्यावर १२ जानेवारीच्या रात्री एका वकिलाला बंदुकीचा धाक दाखवून लुबाडण्यात आले. त्यानंतर थोड्याच अंतरावर तीन महिलांनाही त्या चोरट्यांनी लुबाडले. परंतु या प्रकरणात भाग्यनगर पोलिसांनी गुन्हा नोंदच केला नव्हता. शुक्रवारी ही बाब पोलिस अधीक्षकांपर्यंत पोहचल्यानंतर रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला. अशाचप्रकारे चोरी, जबरी चोरीचे अनेक गुन्हे पोलिसांकडूनच नोंदविण्यात येत नाहीत. तक्रारदारही ठाण्यात चकरा मारून कंटाळून जातो. त्यामुळे चोरट्यांची हिमंत वाढत आहे. हा प्रकार पोलिस अधीक्षकांच्या ऑपरेशन फ्लश आऊटऐवजी गुन्हे नोंदीचेच फ्लश आऊट करण्यासारखा आहे.

**६ हजार**

जिल्ह्यात दरवर्षी सर्व प्रकारचे मिळून ३६ पोलिस ठाण्यांमध्ये जवळपास ६ हजार गुन्हे दाखल होतात. प्रत्यक्षात घडणारे गुन्हे आणि दाखल गुन्ह्यांची संख्या यात मोठी तफावत आहे.

**चोरी, जबरी चोरीच्या गुन्ह्याकडेही दुर्लक्ष**



### प्रत्येक वेळी अधीक्षकांची भेट अशक्य

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ठाणे प्रमुखांना ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक तक्रारादारांचे समाधान करण्याच्या सूचना दिल्या आहेत. परंतू ठाणे प्रमुखांकडून त्याला हरताळ फासण्यात येतो. त्यात प्रत्येक तक्रारदाराला अधीक्षकांची भेट घेणे अशक्य होते.

### दाखलच नाही त्यामुळे तपासही नाही

१. गुन्हे दाखल केल्यास त्याचा तपास करावाच लागतो. प्रत्येक गुन्हा दाखल केल्यास ठाण्यातील गुन्ह्यांची संख्या वाढते. त्यामुळे ते ठाणे प्रमुखांची अडचण करणारे ठरते.

२. त्यापेक्षा तक्रार आली की साध्या नोंदी करायचे अन् तक्रारदाराल परत पाठवून द्यायचे असा प्रकार सुरू आहे. अशा प्रकारामुळे चोरट्यांचे मनोबल वाढत आहे. परिणामी दररोज जिल्ह्यात चोरी आणि लूटमारीच्या घटना घडत आहेत.